**बांधकाम विभाग मुख्यालय जव्हार, जिल्हा परिषद पालघर**
**११०, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, पालघर, बोईसर रोड, पालघर, जि. पालघर**
**इमेल आयडी - eepzpjawhar@gmail.com**

जाक्र.पाजिप/बावि/वशी/आस्था-४/१०९९/२०२४ दिनांक: १९/०७/२०२४

## शुद्धिपत्रक

विषय - जि.प. पालघर अंतर्गत सरळसेवा भरती २०२३, पद - स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक सुधारीत तात्पुरती निवड व प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करणे व कागदपत्र पडताळणीसाठी उपस्थित राहणे बाबत

संदर्भ - या कार्यालयाकडील पत्र क्र जाक्र/पाजिप/बांवि/वशी/आस्था-४/ १०७५ दिनांक ०९/०७/२०२४

जिल्हा परिषद पालघर अंतर्गत सरळसेवा पदभरती परिक्षा २०२३ अंतर्गत स्थापत्य अभियंता सहाय्यक या पदासाठी संदर्भ पत्रान्वये तात्पुरती निवड व प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करण्यांत आली आहे. तसेच निवड व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची कागदपत्रे पडताळणीसाठी संबंधित उमेदवारांना दिनांक १५/०७/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हा परिषद, पालघर येथे उपस्थित राहणेबाबत वरील संदर्भ पत्रान्वये कळविण्यांत आले होते.

तथापि वरील संदर्भान्वये यापुर्वी प्रसिद्ध केलेल्या तात्पुरत्या निवड व प्रतिक्षा यादीमध्ये दिव्यांग उमेदवारांचा समावेश करण्यांत आलेला नव्हता. याद्वारे दिव्यांग उमेदवारांची निवड व प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करण्यांत येत आहे. तसेच यापुर्वी प्रसिद्ध करण्यांत आलेल्या निवड व प्रतिक्षा सूचीतील उमेदवार व यासोबत प्रसिद्ध करण्यांत आलेल्या दिव्यांग निवड व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची पडताळणी दिनांक --२५/०७/२०२४--रोजी सकाळी --११:००-------- जिल्हा परिषद, पालघर येथे आयोजित करण्यांत आली आहे. उपरोक्त बाबत झालेल्या बदलाची संबंधित उमेदवारांनी नोंद घेऊन दिलेल्या दिनांकास आवश्यक सर्व मूळ दस्तऐवज व जाहिरातीत नमूद आवश्यक कागदपत्रांसहित न चुकता उपस्थित रहावे. उक्त दिनांक --२५/०७/२०२४---------- रोजी सकाळी --११:००---------- वाजता कागदपत्रे/दस्तऐवज पडताळणी करिता गैरहजर राहिल्यास गैरहजर राहणा-या उमेदवारांना निवड प्रक्रिये संबंधात कोणताही दावा करता येणार नाही किंवा हक्क सांगता येणार नाही. याची नोंद घ्यावी.

( भानुदास पालवे, भा.प्र.से.)
सदस्य, जिल्हा निवड समिती
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, पालघर

Scanned with CamScanner

# बांधकाम विभाग (जव्हार) जिल्हा परिषद पालघर

११०, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद पालघर, बोईसर रोड, पालघर, जि. पालघर

दूरध्वनी क्रमांक ०२५२० २२२४२० इमेल आय डी- eepzpjawhar@gmail.com


जा.क्र. पाजिप/बांवि/वशी/आस्था-४/ ७०६९ /२०२४

दि १९/०७/२०२४

जिल्हा परिषद,पालघर

सरळसेवा पदभरती- २०२३

**या कार्यालयाव्दारे प्रसिध्द करण्यात आलेल्या सरळसेवा पदभरती -२०२३ नुसार उमेदवारांनी कागदपत्र पडताळणीस घेवून यावयाचे कागदपत्रांची यादी.**

१. पदनिहाय मुळ अर्जात नमुद केलेली सर्व मुळ कागदपत्रे व सत्यप्रत केलेली सर्व कागदपत्रे.
२. संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या मुळ अर्जाची प्रिंट-आऊट तसेच परिक्षा फी जमा केल्याचा पुरावा.
३. **स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक** (Assistant Junior Engineer) पदासाठी अर्ज केलेला उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्याचेकडे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
४. अर्जातील नावाचा पुरावा. (एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता)
५. वयाचा पुरावा.
६. उच्चतम शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा.
७. संगणक अर्हता पुरावा.
८. सामाजिकदृष्ट्या मागासवर्गीय असल्याबाबतचा (जातप्रमाणपत्र, जातपडताळणी प्रमाणपत्र ) पुरावा.
९. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक असल्याबाबतचा पुरावा.
१०. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र.
११. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने ज्या कुंटुंबास शेतकऱ्यांच्या आत्महत्याप्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल त्याबाबतचे कागदपत्र.
१२. पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा.
१३. पात्र माजी सैनिक असल्यास पुरावा.
१४. खेळाडू आरक्षणासाठी पात्र असल्यास पुरावा.
१५. प्रकल्पग्रस्त आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा.
१६. अंशकालीन पदवीधर कर्मचारी आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा.
१७. एस.एस.सी. नावात बदल झाल्याचा पुरावा.
१८. अराखीव महिला, मागासवर्गीय, आर्थिकदृष्ट्या दुर्बल, खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, अंशकालीन पदवीधर कर्मचारी आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र.
१९. मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा.
२०. लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र.
२१. अनुभव प्रमाणपत्र.
२२. छायाचित्र ओळख पुरावा (ओळखपत्र/Photo Identity Card) (आधार कार्ड, वाहन परवाना, पॅनकार्ड, राज्य निवडणूक आयोगाचे निवडणूक ओळखपत्र, पारपत्र, राष्टीयकृत बँकेचे खातेपुस्तक) नजिकच्या काळातील पासपोर्ट साईज दोन फोटो.
२३. नावातील बदलाबाबत प्रमाणपत्र/शासन राजपत्र (लागू असल्यास) त्याबाबतचा पुरावा

**(भानुदास पालवे,भा.प्र.से)**
**सदस्य, जिल्हा निवड समिती**
**तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**

Scanned with CamScanner

स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदासाठी गुणवत्ता यादीतील दिव्यांग उमेदवार यादी

एकूण भरावयाची पदे - २

A) Locomotive Disabilities, O/L,

B) Hearing Impaired 40 % ते 50 %

दिव्यांग - १ Locomotive Disabilities, O/L **निवड यादी**

| अक | बैठक क्रमांक | गुणवत्ता यादीतील क्रमांक | उमेदवाराचे नाव | अर्ज केलेला प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | समांतर आरक्षण | मिळालेले गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९१५००१२५९ | ३३३ | संदेश अरूण भामरे | इ.मा.व. | इ.मा.व. | दिव्यांग | १३२ |
| **प्रतिक्षा यादी** | | | | | | | |
| १ | ३५१५००६०९१ | ३९६ | बालाजी पांडुरंग जगताप | इ.डब्ल्यु.एस. | इ.डब्ल्यु.एस. | दिव्यांग | १२८ |
| २ | ३५१५००६०९३ | ४२१ | किशोर संजय शेप | भ.ज. ड | भ.ज. ड | दिव्यांग | १२८ |

दिव्यांग - १ Hearing Impaired 40 % ते 50 % **निवड यादी**

| अक | बैठक क्रमांक | गुणवत्ता यादीतील क्रमांक | उमेदवाराचे नाव | अर्ज केलेला प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | समांतर आरक्षण | मिळालेले गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३११५०००८२४ | ८१७ | जितेंद्र सुभाष सुरसे | इ.मा.व. | इ.मा.व. | दिव्यांग | १०८ |
| **प्रतिक्षा यादी** | | | | | | | |
| १ | १४१५००३२४८ | ११५९ | पूजा शिवलाल गुंजाळ | भ.ज. क | भ.ज. क | दिव्यांग | ९६ |

**टिप - दिव्यांग व्यक्तिंकरिताचे आरक्षण हे एकूण समांतर आरक्षण आहे. दिव्यांगांसाठी आरक्षीत पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश तो ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे त्या सामाजिक प्रवर्गातून करण्यांत येईल व त्या अनुषंगाने संबंधित सामाजिक प्रवर्गाच्या तयार करण्यांत आलेल्या तात्पुरत्या निवड व प्रतिक्षा यादीत बदल करण्यांत येईल.**

**कार्यकारी अभियंता**
**बांधकाम विभाग**
**जिल्हा परिषद, पालघर**

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी**
**सामान्य प्रशासन विभाग**
**जिल्हा परिषद, पालघर**

**सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती**
**तथा**
**अति. मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, पालघर**

**सदस्य, जिल्हा निवड समिती**
**तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, पालघर**

**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती**
**तथा**
**जिल्हाधिकारी, पालघर**

Scanned with CamScanner